‘‘महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन — विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा’’

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानवविज्ञान विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील विद्यावाचस्पती (पीएच.डी.) पदवीसाठी सादर करावयाच्या शोधप्रबंधाचा आराखडा

संशोधक

प्रा. बालाजी गंगाधरराव दमकोंडवार
नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय
ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुरेश व्हि. धनवडे
समाजशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
शंकरनगर, ता. बिलोली, जि. नांदेड

संशोधन केंद्र

सामाजिक शास्त्रे संकुल
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

''महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन — विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा ''

प्रस्तावना :—

भारत हा विकसनशील देश आहे. भारतातील सर्वच क्षेत्रात विकासाचे आधारस्तंभ म्हणून तरुणांचा विचार केला जातो. देशाच्या विकासाचे आधारस्तंभ म्हणून तरुणांना व विद्यार्थ्यांना सक्षम बनविणे ही आधुनिक काळाची गरज आहे. पुढील काही वर्षात भारताची ओळख जगातील सर्वाधिक तरुणांचा देश म्हणून असेल. म्हणूनच तरुणांना व विद्यार्थ्यांना विकासाचा महत्वपूर्ण आधार व केंद्रबिंदू मानून देशाच्या विकासाची धोरणे निर्माण करणे व राबविणे आवश्यक आहे. भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासाठी केवळ तरुणांची संख्या अधिक असणे पुरेसे नाही तर या तरुणांचे रुपांतर प्रशिक्षित मनुष्यबळात होणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीने कार्य झाले तरच भारताची वाढती तरुणांची संख्या ही भारतासाठी समस्या न ठरता प्रशिक्षित मनुष्यबळ ठरु शकते. या युवाशक्तीला प्रशिक्षित मनुष्यबळात रुपांतरीत करण्याचे एकमेव साधन म्हणजे शिक्षण होय.

१९९१ ला भारताने जागतिकीकरण, उदारीकरण व खाजगीकरणाचे धोरण स्वीकारले आणि भारत हा जागतिक स्पर्धेत सहभागी झाला. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या नवीन संधींनी भारताच्या शैक्षणीक क्षेत्रात गुणवत्तेचे महत्व वाढविले व शिक्षणाची नवनवीन क्षेत्रे विकसित होण्यास सुरुवात झाली. संपूर्ण जगाला एक महत्वपूर्ण व मोठी बाजारपेठ म्हणून भारतात संधी दिसतात.

त्याचप्रमाणे पुढील काळात प्रशिक्षित मनुष्यबळाचा पुरवठा करण्याचे सामर्थ्य असणारा देश म्हणूनही भारताकडे पाहिले जाते. शिक्षणाच्या माध्यमातून गुणवत्तापूर्ण, कौशल्यपूर्ण, जागतिक स्पर्धेत टिकू शकतील असे विद्यार्थी घडविणे ही शिक्षणव्यवस्थेची महत्वाची भूमिका आहे.सध्या विद्यार्थ्याला देशाचा आधारस्तंभ मानले जात आहे. भारतात आज ज्या प्रकारे शिक्षणाच्या विविध संधी, सोयी सवलती निर्माण झाल्या आहेत त्या प्रमाणात स्पर्धा देखील वाढत आहे. या नव्याने निर्माण झालेल्या संधी आणि स्पर्धेच्या तणावातून विविध समस्याही निर्माण झाल्या. ज्या समस्यांपैकी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसारखी अत्यंत गंभीर समस्या दिवसेंदिवस वाढत आहे. सध्याच्या परिस्थितीत शैक्षणीक गुणवत्तेचे प्रश्न, खाजगीकरणामुळे सामान्यांच्या क्षमतेपलीकडे जाणारे उच्चशिक्षण आणि जागतिक स्पर्धेनुसार सर्वच क्षेत्रातील गुणवत्तेचे बदलते आयाम यामुळे विद्यार्थ्यांसमोरील आणि पालकांसमोरील प्रश्न अधिक गंभीर बनत चालले आहेत. बेरोजगारीमुळे निर्माण झालेले नैराश्य हे शिक्षणावरील विश्वास कमी होण्यास कारणीभूत ठरत आहे. ज्या शिक्षणातून जगण्याचे बळ व परिस्थितीशी लढण्याचे सामर्थ्य निर्माण होत नाही. ते शिक्षण जगण्याची उमेद निर्माण करण्यात अपयशी ठरते यातूनच विद्यार्थ्यांच्या आत्महत्येसारखी गंभीर समस्या निर्माण झाली आहे. व दिवसेंदिवस त्याचे प्रमाण वाढत आहे.

आत्महत्येच्या समस्येचे जागतिक स्वरुप :—

जागतिक स्तरावर दर ४० सेकंदाला एक व्यक्ती आत्महत्या करतो आणि जवळपास २० जण आत्महत्येचा प्रयत्न करतात. जगातील सर्वच देशात आणि सर्वच वयोगटात आत्महत्या होत असल्याचे दिसून येते. जागतिक आरोग्य संघटनेच्या २०१४ च्या आत्महत्येच्या समस्येबाबतच्या

प्रथम अहवालात नमुद केल्याप्रमाणे २०१२ मध्ये जागतिक स्तरावर अंदाजित ८०४००० मृत्यू आत्महत्यांमुळे झाले आहेत असे दिसून येते. ज्यामध्ये प्रत्येकी एक लाख लोकसंख्येमागे ११.४ लोक एवढा आत्महत्येचा दर दिसून येतो. जागतिक स्तरावर पुरुषांच्या आत्महत्येचा दर १५.० तर स्त्रियांच्या आत्महत्येचा दर ८.० असल्याचे दिसून येते. वयोमानाचा विचार करता जगातील बहुतांश देशात आत्महत्येचा सर्वाधिक दर ७० वर्ष व त्यावरील वयाच्या स्त्री आणि पुरुष दोघांमध्येही दिसून येतो. काही देशांमध्ये तरुणांच्या आत्महत्येचा दर अधिक आहे. जागतिक स्तरावर १५ ते २९ वर्ष वयोगटातील व्यक्तींच्या मृत्यूसाठी आत्महत्या हे दुसऱ्या क्रमांकाचे कारण असल्याचे दिसून येते. हे निश्चितपणे अतिशय गंभीर आहे. जगातील कमी व मध्यम उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. जगातील अंदाजे ७५ टक्के आत्महत्या या देशांमध्ये घडून येतात. आत्महत्यांचे प्रमाण वाढण्यास सामुदायिक पातळीवर, युध्द, नैसर्गिक आपत्ती, सांस्कृतिक बदलांचा तणाव, भेदभाव किंवा विषमता, पृथकतेची भावना, दुष्कृत्य, हिंसाचार आणि संघर्षात्मक परस्परसंबंध हे घटक कारणीभूत आहेत. तसेच व्यक्तीगत पातळीवर पूर्वी आत्महत्येचा प्रयत्न केलेला असणे, मानसिक अस्थिरता, मादक द्रव्यांचा अतिरेकी वापर, नौकरी गमावणे व आर्थिक नुकसान, प्रचंड वेदनादायी जुनाट आजार व आत्महत्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी हे घटक कारणीभूत ठरतात.

भारतातील आत्महत्येच्या समस्येचे स्वरुप :—

भारतातील आत्महत्येची समस्या ही दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. सर्वच क्षेत्रात आत्महत्यांचे प्रमाण वाढताना दिसून येते. २००५ ते २०१५ या दशकात आत्महत्येच्या प्रमाणात १७.३ टक्के नी वाढ झाली आहे. २०१५ च्या राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाच्या अहवालानुसार भारतात २०१५ मध्ये १,३३,६२३ व्यक्तींनी आत्महत्या केल्या आहेत. दर तासाला १५ आत्महत्या देशात घडून येतात व आत्महत्येचा दर १०.६ (प्रती लक्ष) एवढा असल्याचे दिसून येते यामध्ये स्त्रीपुरुषांचे प्रमाण ६८:३२ आहे. एकूण आत्महत्यांपैकी सर्वाधिक आत्महत्या कौटुंबिक समस्यांमुळे (३४ टक्के) घडून येतात. तर आजारपणामुळे १७.०२ टक्के आत्महत्या घडून येतात. आर्थिक दृष्टीने विचार करता आत्महत्या करणाऱ्या व्यक्तीमधील ७० टक्के व्यक्तींचे उत्पन्न एक लाखापेक्षा कमी आहे. व २५ टक्के व्यक्तींचे उत्पन्न एक ते पाच लाखांपर्यंत आहे. समाजातील विविध घटकांच्या आत्महत्येप्रमाणेच विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाणही दिवसेंदिवस वाढत आहे.

भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची समस्या :—

२००७ —२०१६ या दशकात भारतात ७५,६९७ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. २००७ मध्ये दररोज १७ विद्यार्थी आत्महत्येचा पर्याय निवडायचे. सध्या दररोज २६ विद्यार्थी आत्महत्येसारख्या कृत्याने आपला जीव गमावत आहेत. या आकड्यांवरुन व वाढत्या प्रमाणावरुन या समस्येचे गांभीर्य लक्षात येते. ७५,००० पेक्षाही अधिक कुटुंब या समस्येने मागच्या दशकात होरपळून निघाले आहेत. २००७ मध्ये झालेल्या एकूण ६,२४८ आत्महत्यांपेक्षा २०१६ मध्ये हे प्रमाण ५२

टक्के नी वाढले असून एकूण ९,७७४ विद्यार्थ्यांनी २०१६ मध्ये आत्महत्या केल्या आहेत. २००७ ते २०१६ या दशकात एकूण ७५,६९७ विद्यार्थ्यांनी केलेल्या आत्महत्यांपैकी २३,००० (३० टक्के) आत्महत्या या परिक्षेतील अपयशामुळे घडून आलेल्या आहेत. यातील ७० टक्के विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या इतर कारणांनी घडून आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या ही देशापुढील एक गंभीर समस्या असून विद्यार्थ्यांना आत्महत्येचा पर्याय निवडावा लागणे यात कुटुंबसंस्था, शिक्षणसंस्था, राज्यसंस्था व एकंदरीत समाजव्यवस्थेचे अपयश दिसून येते.

महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या :—

भारतात एक पुरोगामी विचारांचा वारसा असणारे राज्य म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. परंतू सध्या महाराष्ट्र सर्वाधिक आत्महत्येचे प्रमाण असणारे राज्य म्हणून ओळखले जात आहे. देशातील एकूण आत्महत्यांपैकी २०१३ मध्ये १२.३ टक्के, २०१४ मध्ये १२.४ टक्के व २०१५ मध्ये १२.७ टक्के आत्महत्या महाराष्ट्रात झालेल्या आहेत.या तीन वर्षात सर्वाधिक आत्महत्या महाराष्ट्रात घडून आल्या आहेत. महाराष्ट्रात आत्महत्येचा दर १४.२ (प्रति लक्ष) असल्याचे दिसून येते.

देशातील सर्वाधिक आत्महत्यांचे प्रमाण महाराष्ट्रात आहे. तसेच सर्वाधिक विद्यार्थ्यांच्या आत्महत्या देखील महाराष्ट्रात होत आहेत. मागील तीन वर्षात सातत्याने महाराष्ट्र विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या बाबतीत आघाडीवर आहे. महाराष्ट्रात २०१४ मध्ये १,१९१, २०१५ मध्ये १,२३० व २०१६ मध्ये १,३५० विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याची नोंद आहे. ज्यापैकी २०१४ मध्ये ३५९ व २०१५ मध्ये ३८३ विद्यार्थ्यांनी परिक्षेत आलेल्या अपयशामुळे आत्महत्या केल्याचे निदर्शनास येते. विद्यार्थ्यांच्या

एकुण आत्महत्यांपैकी राष्ट्रीय व राज्यपातळीवर जवळपास ३० टक्के आत्महत्या या परिक्षेतील अपयशामुळे झाल्या आहेत. उर्वरीत ७० टक्के आत्महत्या नेमक्या कोणत्या कारणांमुळे किती आत्महत्या झाल्या आहेत हे अहवालात स्पष्टपणे नमुद नाही. म्हणूनच या ज्वलंत समस्येवर ती समस्या गंभीर रुप धारण करण्यापूर्वीच सखोल संशोधन होणे आवश्यक आहे. या समस्येला अनेक जटील पैलू असल्याने त्याचे अध्ययन समाजशास्त्रीय, मानसशास्त्रीय, आर्थिक, राजकीय, वैद्यकीय, शैक्षणिक दृष्टीकोनातून होणे गरजेचे आहे.

नांदेडमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्या :—

राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाच्या अहवालात १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या एकूण ५३ शहरांच्या आकडेवारीचे कारणनिहाय वर्गीकरण उपलब्ध आहे. ज्यामध्ये महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, औरंगाबाद आणि नाशिक या पाच शहरांची विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची आकडेवारी उपलब्ध आहे. नांदेड शहराची लोकसंख्या १० लाखांपेक्षा कमी आहे. त्यामुळे या बाबतची कारणनिहाय संख्या या अहवालात उपलब्ध नाही. राज्याच्या अहवालात उपलब्ध असलेल्या आत्महत्यांच्या आकडेवारीचे राष्ट्रीय अहवालाप्रमाणे कारणनिहाय वर्गीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे राज्याच्या अहवालात नांदेड मधील एकूण आत्महत्यांचे प्रमाण मिळते. परंतू विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण उपलब्ध नाही. पोलीस विभागाकडे उपलब्ध माहिती देखील एकूण आत्महत्यांची नोंद दर्शविते. परंतू कारणनिहाय नोंदी उपलब्ध नाहीत. म्हणून नांदेडमधील विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचे अध्ययन करण्यासाठी सहेतूक व स्नोबॉल नमुना निवडीचा वापर करावा लागेल. वर्तमानपत्रांनी दखल घेतलेल्या व विविध संदर्भातून तसेच आत्महत्या केलेल्या कुटूंबाने

दिलेल्या संदर्भातून या घटनांची नोंद घ्यावी लागेल. उपलब्ध स्रोतानुसार नांदेड मध्ये विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येते. तसेच नांदेड जिल्हयातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे प्रमाण अधिक असल्याचे दिसून येते.

अध्ययनाचे महत्व :-

कोणत्याही देशाच्या विकासाचा आधारस्तंभ विद्यार्थी असतो. समाजातील सर्वच क्षेत्रात सक्षम व जबाबदार नागरीक हे शिक्षणातून निर्माण होतात. शिक्षणाच्या प्रक्रियेत आयुष्यातील सर्व जबाबदाऱ्या योग्यपणे पार पाडण्यासाठी व व्यक्तीमत्व विकासासाठी आवश्यक ज्ञानप्राप्तीमध्ये महाविद्यालयीन जीवनाचा मोठा वाटा आहे. परंतू मागील दशकात सातत्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण वाढत आहे. २०१४ ते २०१६ या तीन वर्षात देशातील सर्वाधिक विद्यार्थ्यांच्या आत्महत्या महाराष्ट्रात घडून आल्या आहेत. नांदेडमध्ये विपूल शैक्षणिक सुविधा असूनही विद्यार्थ्यांच्या आत्महत्या सातत्याने घडून येत आहेत. या समस्येचे अद्यापपर्यंत अध्ययन झालेले नाही. म्हणूनच या समस्येचे समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अध्ययन होणे गरजेचे आहे. जेणेकरुन विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची वास्तविक कारणे जाणून घेवून त्यावर उपाययोजना सुचविण्याच्या उद्देशाने या विषयावर अध्ययन होणे गरजेचे आहे. म्हणून प्रस्तुत संशोधनासाठी **‘‘महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या : एक समाजशास्त्रीय अध्ययन — विशेष संदर्भ : नांदेड जिल्हा ’’** या विषयाची निवड करण्यात आली आहे.

संशोधनाचे उद्देश :—

१) सामाजिकरणाची प्रक्रिया आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या यातील परस्पर संबंध अभ्यासणे.

२) आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटूंबाच्या सामाजिक, शैक्षणिक, मानसिक व आर्थिक स्थितीचे अध्ययन करणे.

३) विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची कारणे जाणून घेणे. (कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक आणि राजकीय कारणे अभ्यासणे.)

४) विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा कुटुंबाच्या समाजिक दर्जावरील परिणाम अभ्यासणे.

५) विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या समस्येवर उपाययोजना सुचविणे/ शोधणे.

गृहितकृत्ये :—

१) सामाजिकरणातील दोष विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस जबाबदार घटक आहे.

२) कुटुंबाचे सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक मागासलेपण विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस कारणीभूत आहे.

३) शैक्षणिक व मानसिक कारणांमुळे आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण आधिक आहे.

४) विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा प्रतिकुल परिणाम त्या कुटूंबाच्या सामाजिक दर्जावर होतो.

५) शहरी संस्कृतीच्या तुलनेत ग्रामीण संस्कृती ही विद्यार्थ्यांच्या आत्महत्येस अधिक कारणीभूत आहे.

साहित्य सर्वेक्षण :—

भारतात आत्महत्यांचे वाढते प्रमाण ही एक गंभीर समस्या आहे. देशात घडून येणाऱ्या विविध आत्महत्यांमध्ये महाराष्ट्रात हे प्रमाण सर्वाधिक आहे. आत्महत्या करणाऱ्या समाजातील विविध घटकांबद्दल संशोधन झाल्याचे दिसून येते परंतू विद्यार्थ्यांच्या आत्महत्या या विषयावर समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून स्वतंत्रपणे संशोधन झाल्याचे संदर्भ कमी प्रमाणात उपलब्ध असल्याचे जाणवते.

१) जागतिक आरोग्य संघटनेचा अहवाल (२०१४) :—

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) २०१४ मध्ये Preventing Suicide A Global Imperative हा आत्महत्यासंदर्भात पहिला अहवाल प्रकाशित केला. या अहवालात जागतिक स्तरावर बहुतांश देशात आत्महत्येच्या समस्येला शासनाकडून व धोरण निर्मात्यांकडून कमी प्राधान्य दिले जात असल्याचे मत नोंदविले आहे. जागतिक स्तरावर सार्वजनिक आरोग्याच्या धोरणांमध्ये प्रत्येक देशाने आत्महत्येच्या समस्येला प्राधान्य द्यावे, आत्महत्येच्या समस्येसंदर्भात प्रतिबंधात्मक प्रयत्न वाढवावे तसेच या समस्येबाबत जाणीव जागृती निर्माण व्हावी या उद्देशाने हा अहवाल प्रकाशित करण्यात आला आहे.

या अहवालात जागतिक स्तरावर आत्महत्या व आत्महत्येचा प्रयत्न करणे या समस्यांचे स्वरुप व तिव्रता यांचे विश्लेषण केले आहे. आत्महत्येसाठी कारणीभूत असणारे विविध घटक, आत्महत्यांना प्रतिबंध घालण्यासाठी विविध देशांमध्ये राबविली जाणारी धोरणे व कार्यक्रम यांचा सविस्तर आढावा घेण्यात आला आहे. प्रत्येक देशाने आत्महत्येसंदर्भात धोरणे ठरवितांना कोणकोणत्या घटकांवर आपले लक्ष केंद्रित करावे तसेच

विविध धोरणांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी, राष्ट्रीय धोरणांचे मूल्यमापन करण्यासाठी कोणकोणत्या पैलूंवर भर दयावा याबाबत मार्गदर्शक सुचना करण्यात आल्या आहेत. या अहवालात विविध देशांच्या व्यष्टी अध्ययनातून आकडेवारीच्या आधारावर विविध बाबी स्पष्ट करुन मार्गदर्शक अशा शिफारशी करण्यात आल्या आहेत.

२) राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाचे अहवाल (२००५ ते २०१५):—

राष्ट्रीय गुन्हे अभिलेख विभागाद्वारे (National Crime Records Bureau) Accidental Deaths and Suicides in India या नावाने १९६७ पासून दरवर्षी अहवाल प्रकाशित केला जात आहे. २००५ ते २०१५ या दशकातील अहवालांचे अध्ययन या ठिकाणी करण्यात आले आहे. या अध्ययनावरुन स्पष्ट होते की, भारतातील सर्वच घटकांमधील आत्महत्यांचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. या अहवालात आत्महत्येचा दर, राज्य व केंद्रशासीत प्रदेशातील आत्महत्यांचे प्रमाण, आत्महत्येची विविध कारणे, आत्महत्या करणाऱ्या व्यक्तींचे वय, लिंग, व्यवसाय आणि सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक स्थितीनुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. आत्महत्या करण्यासाठी स्विकारण्यात आलेल्या पध्दती व साधने यांचे सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. भारतातील १० लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या ५३ मोठया शहरातील आत्महत्यांचे विश्लेषण वरील घटकांच्या आधारे करण्यात आलेले आहे. या अहवालांच्या अध्ययनावरुन भारतात आत्महत्यांचे प्रमाण पुरुषांमध्ये अधिक असल्याचे दिसून येते, तसेच कौटुंबिक कारणांमुळे सर्वाधिक आत्महत्या होत असल्याचे स्पष्ट होते. कमी उत्पन्न असणाऱ्या कुटुंबांमध्ये हे प्रमाण सर्वाधिक आहे. तसेच अशिक्षितांपेक्षा शिक्षितांमध्ये आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. भारतात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येमध्ये मुलींपेक्षा

मुलांचे प्रमाण अधिक आहे. एकूण विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये सरासरी ३० टक्के विद्यार्थी परिक्षेतील अपयशामुळे आत्महत्या करतात.

२०११ व २०१२ या दोन वर्षात महाराष्ट्र आत्महत्यांमध्ये देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे. तर २०१३ ते २०१५ या तीन वर्षात प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची समस्या देखील सातत्याने वाढत आहे. २०१४ ते २०१६ या तीन वर्षात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. महाराष्ट्रात विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांमध्ये मुलांपेक्षा मुलींचे प्रमाण अधिक आहे. महाराष्ट्रातही विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या कारणांमध्ये परिक्षेतील अपयशामुळे झालेल्या आत्महत्यांचे प्रमाण ३० टक्के च्या जवळपास आहे. परंतू उर्वरीत ७० टक्के विद्यार्थी आत्महत्या करण्याची कारणे नेमकी कोणती आहेत याबाबत अहवालामध्ये स्पष्टपणे नमुद नाही. तसेच महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, औरंगाबाद, नाशिक व नागपूर या दहा लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असणाऱ्या पाच शहरांची विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी उपलब्ध आहे. परंतू राज्यामधील इतर शहारांबद्दल विद्यार्थ्यांच्या आत्महत्येची आकडेवारी उपलब्ध नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या समस्येबाबत सूंपर्ण आकलन होत नाही.

३) गुन्हे अन्वेषन विभाग महाराष्ट्र चे अहवाल.(२०१२ ते २०१६) :—

राज्य गुन्हे अभिलेख केंद्र, गुन्हे अन्वेषन विभागाद्वारे Crime in Maharashtra या नावाने दरवर्षी अहवाल प्रकाशित केला जातो. या अहवालात राज्यातील सर्व प्रकारच्या गुन्हयांच्या आकडेवारीच्या आधारावर विश्लेषण करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील आत्महत्यांचे लिंगानुसार व जिल्हानिहाय वर्गीकरण करण्यात आले आहे. यावरुन महाराष्ट्रात आत्महत्यांचे प्रमाण वाढत असल्याचे लक्षात येते.

आत्महत्या करणाऱ्यांमध्ये पुरुषांचे प्रमाण स्त्रियांपेक्षा दुप्पट व त्यापेक्षाही अधिक असल्याचे स्पष्ट होते. या अहवालात एकूण आत्महत्यांचे प्रमाण उपलब्ध आहे. परंतू विविध कारणांनुसार व विविध आधारावर वर्गीकरण करण्यात आलेले नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबद्दलची जिल्हानिहाय आकडेवारी उपलब्ध नाही.

४. राणे अनिल, नाडकर्णी अभिजीत (२०१४) :—

आत्महत्या व त्यांच्या कारणांच्या संदर्भात ३६ शोधनिबंधाचे गुणात्मक विश्लेषण करुन १९७५ ते २०१० पर्यंत झालेल्या संशोधनातून आलेल्या निंष्कर्षांचा आढावा त्यांनी आपल्या Suicide in India : a systematic review या शोधनिबंधात घेतला आहे. आत्महत्या करण्यासाठी वापरलेल्या पध्दती व आत्महत्येशी संबंधीत कारणांमध्ये वय, लिंग, वैवाहिक स्थिती, शिक्षण, व्यवसाय, सामाजिक, आर्थिक दर्जा, निवासस्थान, मानसिक तणाव, मानसिक आजार या घटकांचा आढावा घेण्यात आला आहे. भारतात आत्महत्यांच्या संर्दर्भात उपलब्ध असणारी माहिती मर्यादित असल्याचे मत त्यांनी मांडले. तसेच आत्महत्येचे वाढते प्रमाण ही सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने गंभीर समस्या असून शासनाकडून आणि समाजाकडून त्याची योग्य दखल घेतली जात नाही. आर्थिकदृष्टया विकसित देशांच्या तुलनेत भारतात तरुण स्त्रीयांच्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. भारतातील आत्महत्यांसाठी मानसिक आजारांपेक्षा दारिद्रय अधिक प्रमाणात जबाबदार असल्याचे मत त्यांनी नोंदविले. भारतात किटकनाशके प्राशन करुन होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाण अधिक आहे. भारतात आत्महत्यांवर प्रतिबंध घालण्यासाठी आत्महत्येस गुन्हा न मानणे, किटकनाशकांच्या उपलब्धतेवर मर्यादा

घालणे आणि आत्महत्येला कारणीभूत वर्तनावर लक्ष ठेवण्याच्या पध्दतीत सुधारणा करणे गरजेचे आहे, या शिफारशी त्यांनी सुचविल्या.

5. विजयकुमार लक्ष्मी (२०१५) :—

भारतात १९७५ ते २००५ या तीन दशकात झालेल्या आत्महत्यांचे अध्ययन प्रकाशित साहित्य व शोधनिबंधाच्या आधारावर करण्यात आले आहे. Indian Journal Of Psychiatry यामध्ये १९५८ ते २००९ दरम्यान प्रकाशित झालेले ५४ शोधनिबंध व इतर प्रकाशित साहित्य या आधारावर Indian Research on Suicide या शोधनिबंधात आत्महत्यांबाबत निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. भारतात नोंद झालेल्या आत्महत्यांपेक्षा वास्तविक प्रमाण अधिक असल्याचे मत या विविध साहित्यात मांडण्यात आले आहे. भारतात १९७५ ते १९८५ व १९८५ ते १९९५ या दोन दशकात आत्महत्यांचा दर जवळपास समान आहे. परंतू १९९५ ते २००५ या दशकात आत्महत्यांचा दर ३५ टक्के नी वाढल्याचे दिसून येते. १९७५ ते २००५ दरम्यान हा दर ४३ टक्के नी वाढला आहे. आत्महत्यांमध्ये स्त्रीपुरुष गुणोत्तर जवळपास सारखेच आहे. भारतातील ७१ टक्के आत्महत्या ४४ वर्षाखालील व्यक्तींनी केलेल्या आहेत. यासाठी प्रचंड सामाजिक, भावनिक व आर्थिक दबाव कारणीभूत असल्याचे दिसून येते. विष प्राशन करणे, फाशी घेणे, व विशेषत: स्त्रीयांमध्ये जाळून घेणे या पध्दतींचे आत्महत्यांमधील प्रमाण अधिक आहे. आत्महत्यांसाठी शारीरीक व मानसिक आजार, विस्कळीत नातेसंबंध, आर्थिक अडचणी ही प्रमुख कारणे जबाबदार आहेत. आत्महत्या करणाऱ्यांमध्ये स्त्रीया, शेतकरी, विद्यार्थी यांचे प्रमाण अधिक आहे. समाजाकडून व शासनाकडून योग्य प्रतिसाद व मानसिक आजाराची योग्य दखल घेणे या बाबी आत्महत्येवर

प्रतिबंध घालण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी नोंदविले आहे.

संशोधन आराखडा :-

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक आणि निदानात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग केला जाणार आहे. वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या समस्येसंदर्भात वास्तविक तथ्यांचे व कारणांचे वर्णनात्मक विश्लेषण प्रस्तुत केले जाईल. तसेच निदानात्मक अराखडयाचा उपयोग करुन महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांच्या जाणून घेण्यात आलेल्या कारणांवर योग्य उपाययोजना सुचविल्या जातील. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्येशी संबंधीत सर्व पैलूंचे सुक्ष्म अध्ययन करण्यासाठी गुणात्मक पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे.

अध्ययन क्षेत्र :-

प्रस्तुत संशोधनासाठी नांदेड जिल्हा हे अध्ययनाचे क्षेत्र म्हणून निवडण्यात आले आहे. यामध्ये नांदेड शहर व नांदेडमधील १६ तालुक्यांचा समावेश करण्यात आला आहे.

अध्ययनाचे एकक :-

प्रस्तुत संशोधनात नांदेड जिल्हयातील आत्महत्या केलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांस (११ वी ते पदव्युत्तर अभ्यासक्रमांचे व समकक्ष असणाऱ्या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी) अध्ययनाचे एकक म्हणून निवडण्यात आले आहे व त्यांच्याशी संबंधीत सर्व पैलूंचे अध्ययन केले जाणार आहे.

नमुना निवड पध्दती :-

प्रस्तुत संशोधनामध्ये २०१७ नंतर आत्महत्या केलेल्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे अध्ययन केले जाणार आहे. यासाठी उद्‌देशपूर्ण तसेच स्नोबॉल नमुना निवड पध्दतीचा वापर केला जाणार आहे.

व्यष्टी अध्ययन पध्दती :-

प्रस्तुत संशोधनासाठी व्यष्टी अध्ययन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. ज्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत त्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन परिस्थितीचे सखोल अध्ययन करण्यासाठी व्यष्टी अध्ययन पध्दत ही अतिशय उपयुक्त आहे.

आत्महत्या करणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या नांदेडमध्ये कमी आहे. परंतू हे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. म्हणून त्या विद्यार्थ्यांच्या परिस्थितीच्या प्रत्येक पैलूचे सखोल अध्ययन करण्यासाठी आणि या समस्येबाबत गुणात्मक तथ्यांचे संकलन करण्यासाठी व्यष्टी अध्ययन पध्दत ही अतिशय उपयुक्त आहे.

तथ्य संकलनाची साधने :-

प्रस्तुत संशोधनात संशोधन समस्येचे वर्णनात्मक विश्लेषण केले जाणार आहे. त्यासाठी प्राथमिक व दुय्यम तथ्य संकलनाच्या साधनांद्वारे वास्तविक तथ्यांचे संकलन केले जाईल.

प्राथमिक स्रोत :—

यामध्ये निरिक्षण, मुलाखत पध्दतीचा तसेच अनुसूचीचा उपयोग केल्या जाणार आहे.

दुय्यम स्रोत :—

यामध्ये विविध शासकीय अहवाल, पुस्तके, मासिके, पाक्षिके, साप्ताहिके, वर्तमानपत्रे, संशोधन प्रबंध, संशोधन पत्रिका, प्रकाशित शोध निबंध, इंटरनेट वेबसाईटस्, इत्यादिंचा वापर केला जाणार आहे.

तथ्यांचे विश्लेषण :-

प्रस्तुत संशोधनाचे स्वरुप गुणात्मक असल्याने यामध्ये आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांशी संबंधीत परिस्थितीचे, कारणांचे व परिणामांचे वर्णनात्मक विश्लेषण केले जाणार आहे.

अध्ययनाच्या मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन हे नांदेड जिल्हयातील सर्व १६ तालुके व नांदेड शहर यातील ज्या विद्यार्थ्यांनी आत्महत्या केलेल्या आहेत त्यावर आधारीत आहे. म्हणून सदरील अध्ययनाचे निष्कर्ष नांदेड जिल्हयापुरते मर्यादित राहतील.

प्रकरणांची रुपरेषा

प्रकरण पहिले : प्रस्तावना

या प्रकरणात अध्ययनाशी संबंधीत संकल्पना स्पष्ट केल्या जातील. तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे जागतिक स्वरुप, भारतातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे स्वरुप, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांचे स्वरुप, नांदेडमधील विद्यार्थ्यांचे आत्महत्यांचे स्वरुप इत्यांदी बाबत विवेचन करण्यात येईल.

प्रकरण दुसरे : साहित्य सर्वेक्षण आणि संशोधन पध्दती

या प्रकरणात या समस्येबाबत झालेल्या अध्ययनाचा त्याबाबत काढलेल्या निष्कर्षांचा आढावा घेण्यात येईल. यामध्ये शासनाचे राष्ट्रीय व राज्यपातळीवरील अहवाल, शोधप्रबंध, प्रकाशित शोधनिबंध, पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे इत्यादिंचे अध्ययन केले जाईल. तसेच संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या संशोधन पध्दती संदर्भात स्पष्टीकरण देण्यात येईल. यामध्ये अध्ययनाचे उद्‌देश, गृहितकृत्ये, अध्ययनाचे क्षेत्र, महत्व, संशोधन आराखडा, व्यष्टी अध्ययन पध्दती, नमुना निवड पध्दती, तथ्य संकलनाची साधने, विश्लेषण पध्दती इत्यादीचे विवेचन केले जाईल.

प्रकरण तिसरे : आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक , शैक्षणिक स्थितीचे अध्ययन

प्रस्तुत प्रकरणात आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या समाजिक स्थितीचे, दर्जाचे, कौटुंबिक संबंधाचे तसेच कुटुंबातील सदस्यांची शैक्षणिक स्थिती, त्यांचा शिक्षणाप्रती दृष्टीकोन, कुटुंबियांकडून मिळणाऱ्या शैक्षणिक सुविधा इत्यादिंचे अध्ययन केले जाईल.

प्रकरण चौथे : आत्महत्या करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या आर्थिक व मानसिक स्थितीचे अध्ययन

या प्रकरणात त्या कुटुंबांची आर्थिक स्थिती, उत्पन्नाची साधने, शैक्षणिक खर्चाबाबत दृष्टीकोन, नियोजन तसेच कुटुंबातील सदस्यांची मानसिकता, मुलामुलींबाबत दृष्टीकोन, शिक्षणविषयक मानसिकता, सामाजिक प्रथांबाबतचा दृष्टीकोन, सामाजिकरणाचे स्वरुप इत्यादिंचे अध्ययन केले जाईल.

प्रकरण पाचवे : महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची कारणे

प्रस्तुत प्रकरणात विद्यार्थ्यांच्या आत्महत्येबाबत कौटुंबिक, मानसिक, सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक व राजकीय कारणांचे सविस्तर अध्ययन केले जाईल.

प्रकरण सहावे : विद्यार्थ्यांच्या आत्महत्येचा कौटुंबिक दर्जावरील परिणाम

या प्रकरणात त्यांच्या पाल्याने आत्महत्या केल्यामुळे कुटुंबातील नातेसंबंध, कौटुंबिक संवाद, कुटुंबियांना समाजातर्फे, नातेवाईकांतर्फे मिळणारी वागणूक त्यातील बदल इत्यादींचे अध्ययन केले जाईल.

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

या प्रकरणात विद्यार्थ्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक, शैक्षणिक, मानसिक व आर्थिक स्थितीबाबत, विद्यार्थ्यांच्या आत्महत्येच्या कारणांबाबत व त्यांचा कुटूंबाच्या दर्जावरील परिणामाबाबत निष्कर्ष काढण्यात येतील. तसेच अध्ययनातून प्राप्त झालेल्या निष्कर्षांच्या आधारे उपाययोजना व शिफारशी सुचविल्या जातील.

परिशिष्टे व छायाचित्रे :

संदर्भ ग्रंथ सुची

संदर्भ सुची :—

१. ब्राऊन व्हर्जिनिया, क्लार्क व्हिक्टोरिया. (२०१७). *यशस्वी गुणात्मक संशोधन.* न्यु दिल्ली : सेज पब्लीकेशन्स.

२. क्रेसवेल जॉन. (२०१७). *संशोधन संरचना — गुणात्मक, संख्यात्मक आणि मिश्र पध्दतींचे दृष्टीकोन,* न्यु दिल्ली : सेज पब्लीकेशन्स.

३.	आगलावे प्रदिप. (२०१६). *सामाजिक संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे.* (सहावी आवृत्ती). नागपूर: श्री. साईनाथ प्रकाशन.

४.	बोधनकर सुधीर, अलोणी विवेक, कुळकर्णी मृणाल. (२०१८). *सामाजिक संशोधन पध्दती.* (आठवी आवृत्ती). नागपूर : श्री. साईनाथ प्रकाशन.

५.	Ahuja, R. (2018). *Research Methods*. New Delhi: Rawat Publications.

६.	World Health Organization. (2014). *Preventing Suicide A global imperative.* Retrieved from https://www.who.int/mentalhealth/suicide-prevention/world_report_2014/en/

७.	National Crime Records Bureau. (2005-2015). *Accidental Deaths and Suicides in India*. Retrieved from http://ncrb.gov.in/StatPublications/ADSI/PrevPublications.htm

Crime Investigation Department. (2012-2016). *Crime in Maharashtra* Retrieved from http://mahacid.com/activities.html

८.	Vijaykumar, L., (2010). Indian Research On Suicide. *Indian Journal of Psychiatry, 52, S291-S296 Retrieved From* http://www.Indianjpsychiatry.org/temp/IndianJPsychiatry5272912365065_063410.pdf

९.	Rane, A., & Nadkarni, A. (2014). Suicide in India: a systematic review. *Shanghai Archives of Psychiatry,* 26(2), 69-80. Retrieved From https://www.ncbi.nlm.nih.gov/pmc/articles/PMC4120287/

१०. Thakur, U. (1963) *The History of Suicide in India.* Delhi: Munshi Ram Manohar Lal Publishers.

संशोधक

प्रा. बालाजी गंगाधरराव दमकोंडवार

नेवजाबाई हितकारिणी महाविद्यालय ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर

मार्गदर्शक

प्रा. डॉ. सुरेश व्हि. धनवडे

समाजशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,शंकरनगर,
ता. बिलोली, जि. नांदेड